प्रकरण तिसरे

# राष्ट्रीय सेवा योजना

## अर्थ, स्वरूप, उद्दिष्टे

प्रकरण तिसरे

# राष्ट्रीय सेवा योजना अर्थ, स्वरूप, उद्दिष्टे


३.१ प्रस्तावना

३.२ राष्ट्रीय सेवा योजनेचा अर्थ

३.३ राष्ट्रीय सेवा योजनेची संरचना

३.४ राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वरूप

३.५ राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमातील विविध घटकांची नामावली व संकल्पना

३.६ राष्ट्रीय सेवा योजनेची मुलतत्त्वे

३.७ राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टे

प्रकरण तिसरे

# राष्ट्रीय सेवा योजना अर्थ, स्वरूप, उद्दिष्टे

## ३.१ प्रस्तावना :

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करणे व त्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्त्वविकास घडवून आणणे या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजनेची सुरुवात झाली. विद्यार्थीवर्गा मध्ये सामाजिक जाणीव, स्वावलंबन, नैतिकता, राष्ट्रीय एकात्मता, आपुलकीची भावना, बंधुभाव इ. चांगले विचार रुजविण्यासाठी विद्यार्थ्यांनी पदवी शिक्षण पूर्ण करताना प्रवेश घ्यावा लागतो.

आजची पिढी खूप हुशार आहे. आज शैक्षणिक गुणवतेत कोणताही विद्यार्थी कमी नाही. पैकीच्या पैकी गुण घेऊन विद्यार्थी आपली गुणावता सिद्ध करू लागला याबरोबरच नौकरी करू लागला पण हे सर्व व्यक्ती स्वत:साठी करतो, पण समाजासाठी काहीतरी केल पाहिजे. समाजासाठीही आपण काही देन लागतो या अशा विचाराच्या प्रेरणेतून विद्यार्थ्यामध्ये सामाजिक दृष्टीकोन निर्माण होण्यासाठी या योजनेची शिकवण उपयोगी पडते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा अभ्यासत्तेतर वेळ कट्यावर, उपहार गृहामध्ये न जाता त्या वेळेचा सदउपयोग व्हावा यासाठी विद्यार्थ्यांनी समाजासाठी / राष्ट्रासाठी काम करावे. कारण, आजचा युवक हा राष्ट्राचा भावी आधारस्तंभ आहे. विद्यार्थ्याला विद्यार्थी जीवनात जे विचार मिळतात त्याच विचाराचा स्वीकार व्यक्ती अजन्म करत असतो. आजची पिढी व्यसनाधीनतेच्या अधीन गेली आहे. युवकांमध्ये चंगळवादी प्रवृत्ती रुजली आहे. याबरोबरच सामाजिक जाणीव देखील कमी होत चालली आहे. याला आजची शिक्षणपद्धती जबाबदार नाही तर आजची परिस्थिती कारणीभूत आढळते. विद्यार्थी हाच समाजाचा जबाबदार घटक आहे. त्यामुळे विद्यार्थीदसेतच त्याला शिक्षणाबरोबर चांगल्या विचाराची व संस्काराची गरज आहे. राष्ट्रीय सेवा योजना ही बिनभिंतीची शाळा आहे. येथे विद्यार्थ्याला चांगले विचार देऊन घडवले जाते. आज विज्ञानाची प्रगती झपाट्याने वाढत आहेत. माणसे एकमेकांशी जोडर्ल गेली आहेत. परंतु जशी जशी प्रगती होत चालली तशी परस्परातील माणुसकी लोप पावत चालली आहे. याबरोबरच समता, बंधुभाव ही मुल्ये पायदळी तुडवली जात आहेत. दुर्दैवाने युवक भरकटत जात आहे. या सर्व प्रकाराला आळा घालण्यासाठी प्रत्येक विद्यार्थी

राष्ट्रीय सेवा योजनेशी जोडला गेला पाहिजे. राष्ट्रीय सेवा योजनेमुळेच माणुसकीचे ज्ञान विद्यार्थ्याला मिळते.

## ३.२ राष्ट्रीय सेवा योजनेचा अर्थ :

राष्ट्रीय सेवा योजना वरिष्ठ महाविद्यालयातून विद्यापीठाद्वारे राबविण्यात येणारी महत्त्वपूर्ण योजना आहे. सेवा व युवा राष्ट्रीय सेवा योजनेचा केंद्रबिंदू आहे. the overall aim of National Service Scheme as envisaged earlier, is to give an extension dimension to the higher education system and grient the student youth to community service while they are studying in education institution.[२]

समाजसेवेतून शिक्षण हा या योजनेमागचा महत्त्वाचा हेतू आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या फावल्या वेळेचा सदुपयोग करण्यासाठी समाजसेवा करावी ही या योजनेची महत्त्वाची भूमिका आहे. "शिक्षण ही एक माणूस घडविणारी प्रक्रिया आहे. शिक्षणाच्या विविध प्रक्रियेत व्यक्ती जीवनावर संस्कार होणे अभिप्रेत असते. या दृष्टीने महाविद्यालयीन विद्यार्थ्यात मानवी धर्म, एकात्मभाव यासारख्या सामाजिक व नैतिक मुल्यांची पेरणी करणे हा राष्ट्रीय सेवा योजनेचा मुख्य उद्देश आहे. त्याचबरोबर असणाऱ्या विविध सामाजिक समस्या सोडवण्याच्या दृष्टीने विधायक व रचनात्मक कार्याला वाहून घेणारी एक पिढी निर्माण करणे, तसेच त्यांचा व्यक्तिमत्त्व विकासाबरोबर त्यांच्यात सामाजिक बांधिलकी निर्माण करून त्याला समाजाभिमुख बनवणारी ही योजना आहे."[३] सामाजिक दृष्टीकोनातून युवक आपल्या शिक्षणाचा उपयोग हा समाजाची सेवा करण्यास देतात.

महाविद्यालयाच्या बाहेर म्हणजेच समाजात जाऊन शिक्षण देणारे अनौपचारिक व्यासपीठ म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना होय. "आपण महाविद्यालयाच्या चार भिंतीत पुस्तकी ज्ञानाचे पाठ नेहमीच घेतो. पण पुस्तकी ज्ञानाने विद्यार्थी खऱ्या अर्थाने डोळस बनत नाही. जीवनात समर्थपणे उभे राहण्यासाठी बिन भिंतीचे विद्यापीठ म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेची उपक्रमशीलता होय."[४] राष्ट्रीय सेवा योजनेमुळेच युवकांना जीवनाचा खरा अर्थ कळतो.

"महाविद्यालयातून वावरणारी ही तरुणशक्ती विधायकतेकडे वळवावी म्हणून काही उत्तम संधी-मंच निर्माण केले गेले. अशाच एका मंचाचे नाव आहे राष्ट्रीय सेवा योजना."[५] या योजनेद्वारे समाज

प्रबोधन, राष्ट्रसेवा, राष्ट्रीय जागृती, बंधुभाव इ.कार्य राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी करतात. "मी माझ्यासाठी जगताना थोडे बहुत इतरा करिता जगावे काही क्षण वंचित दु:खीता सोबत घालवावेत पुस्तके वाचतानाच समाज वाचवा माणूस वाचतांना समजून घेताना त्याला पूर्ण सुनवाईची संधी द्यावी. त्याचे मन मोकळे झाल्यानंतर डोळ्यातून येणारे दोन अश्रू अलगद पुसावेत यापेक्षा समाजकार्य काही वेगळे नसते. अशा समाज कार्याची अनुभूतीयुक्त जान देणारा मंच म्हणजेच राष्ट्रीय सेवा योजना."[६] शिक्षण आणि समाज यांना एकत्र आणण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजनेनी केले आहे.

"The educated youth who are expected to take the reins of administration on in furture are found to be unaware of the problems of the village / slum community and in certain village/slum community and in certain cases are indifferent towards their needs and problems. Therafore it is necessary to arouse the social conscience of the students, and to provide then an opportunity to work with the people in the village and slums. It is felt that their interaraction with the common villagers and slum dwellers will expose them to the realities of life and bring about a change in their social perception."[७]

ग्रामीण समाजाच्या पुनर्बांधणीसाठी तरुण शक्ती विधायक व रचनात्मक कार्याशी जोडणे त्यांच्यात सामाजिक जाणीव वाढविणे, सामाजिक समस्यांची आव्हाने पेलण्याची शक्ती तरुण वर्गात निर्माण करणे राष्ट्राच्या विकासात तरुणांचा सहभाग वाढविणे समाजात प्रगतीशील दृष्टीकोन निर्माण करण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेचे युवक करतात. म्हणजेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या युवकांनी जन सेवा हीच ईश्वर सेवा या तत्वाचा अवलंब केलेला आहे. युवकांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण झाल्यामुळे युवक समाजसेवेचे कार्य तळमळीने करू लागला व समाज हेच माझ कुटुंब माणू लागला.

"'मी' चा 'आम्ही' मध्ये विस्तार करून परसपरावलंबी दुनियेत सामिलकीची जान करून देणारे कृतीशील व्यासपीठ म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना."[८]

राष्ट्रीय सेवा योजनेचे बोध वाक्य निश्चितच परिपूर्ण अर्थ समजून घेण्यासाठी महत्त्वाचा ठरतो. राष्ट्रीय सेवा योजनेचे बोधवाक्य ***Not me but you*** (माझ्यासाठी नव्हे तर तुम्ह्च्यासाठी) हे आहे.

त्यागाची भावना, सामाजिक जाणीव, निरपेक्ष सेवा, बंधुभाव, आपुलकीची भावना इत्यादींची प्रेरणा या बोधावाक्यातून मिळते. स्वत: साठी आपण कोणतेही कार्य करू शकतो, परतु दुसऱ्यासाठी आपण काही तरी केल पाहिजे अशी प्रेरणा या बोधवाक्यातून मिळते.

**१) राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रतिक/चिन्ह :**

राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रतिक हे ओरिसा राज्यातील कोणार्क सूर्य मंदिराच्या रथाच्या चाकावर आधारित आहे. आपल्याला या चाकाचा अर्थ बोध होत असतो. चक्र हे गतिमानतेचे प्रतिक आहे. आयुष्याचा रथ असाच गतिमान असावा व तो प्रगतीकडे वाटचाल करणारा असावा या गतीमुळे सामाजिक परिवर्तन होऊ शकते. राष्ट्रीय सेवा योजनेचे चक्र हे समाजाच्या परिवर्तनासाठी सतत गतिमान राहणार आहे.

**२) राष्ट्रीय सेवा योजनेचा बिल्ला :**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या चिन्हावर आधारित बिल्ला तयार करण्यात आला आहे. या बिल्यावर राष्ट्रीय सेवा योजनेचे बोध वाक्य सुद्धा आहे. स्वंयसेवक नियमित कार्यक्रमात व विशेष शिबिरात वेगवेगळ्या कार्यक्रमाच्या वेळी हा बिल्ला स्वंयसेवक आपल्या छातीवर लावतो.

**३) राष्ट्रीय सेवा योजना दिवस :**

राष्ट्रीय सेवा योजना ही २४ सप्टेंबर १९६९ रोजी सुरु करण्यात आली त्यामुळे २४ सप्टेंबर हा राष्ट्रीय सेवा योजना दिवस मानण्यात येतो. या दिवशी विद्यापीठ व महाविद्यालयात विविध कार्यक्रमाचे आयोजन करून राष्ट्रीय सेवा योजना दिवस साजरा केला जात असतो.

## ३.३ राष्ट्रीय सेवा योजनेची संरचना :

राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य सुव्यस्थित पार पाडण्याची एक संरचना आहे.

सचिव
युवा कल्याण व खेळ मंत्रालयभारत सरकार, नवी दिल्ली
▼
कार्यक्रम सल्लागार
▼
सह कार्यक्रम सल्लागार
▼
मा.मंत्री उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य सल्लागार समिती
▼
सचिव /उच्च व तंत्र शिक्षण विभाग
▼
सहाय्यक कार्यक्रम सल्लागार, रासेयो क्षेत्रीय कार्यालय
▼
राज्यसंपर्क अधिकारी, रासेयो कक्ष
▼
मा.कुलगुरू / विद्यापीठ सल्लागार समिती
▼
जिल्हा समन्वयक / विभागीय समन्वयक
▼
प्राचार्य / महाविद्यालय सल्लागार समिती
▼
कार्यक्रम अधिकारी
▼
स्वंयसेवक
▼
समाज

तक्ता क्र. ३.१

## ३.४ राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वरूप :

राष्ट्रीय सेवा योजनेची सुरुवात २४ सप्टेंबर १९६९ रोजी झाली. या योजनेत तेव्हा ४० हजार विद्यार्थी व केवळ ३७ विद्यापीठात ही योजना प्रायोगिक तत्वावर सुरु केली होती. इ.स २०११-२०१२ मध्ये ही संख्या ३५ लाख विद्यार्थी या योजनेत काम करीत आहेत.

### ३.४.१. राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय पातळीवर

केंद्र शासनाच्या युवा कल्याण व खेळ मंत्रालयांअंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना राबविण्यात येते राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय सेवा योजनेचे धोरण आखले जाते. राष्ट्रीय सेवा योजनेची धोरणात्मक दिशा ठरविण्यासाठी एका समितीची स्थापना करण्यात येते या समितीत अतिशय महत्त्वाच्या व्यक्तीचा समावेश असतो. या समितीचे सदस्य विद्यापीठ अनुदान मंडळ (UGC) चे अध्यक्ष, राज्यांचे शिक्षणमंत्री, आठ कुलगुरू, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम सल्लागार, सहाय्यक कार्यक्रम सल्लागार (बोर्ड) असते.

या समितीचे कार्य खालील प्रमाणे आहेत.

१) कार्यक्रमाचे वार्षिक अंदाजपत्रक तयार करणे.

२) राष्ट्रीय सेवा योजनेनी केलेल्या कार्याचे मुल्यमापन करणे व आदेश देणे.

३) मार्गदर्शन करणे.

४) शिबिरासंबधी मार्गदर्शन करणे.

५) राष्ट्रीय सेवा योजनेचे साहित्य प्रकाशित करणे.

### ३.४.२. राष्ट्रीय सेवा योजना आंतरराज्य पातळीवर

राष्ट्रीय सेवा योजनेचे आंतरराज्य कार्यालये चार ठिकाणी म्हणजेच चार विभागात विभागलेले दिसून येते, त्या चैनई, अहमदाबाद, कोलकत्ता, चंदिगढ येथे मुख्य कार्यालये आहेत. या व्यतिरिक्त देशात १५ विभागीय कार्यालये सुद्धा आहेत.

शहरी संस्कृतीत वाढलेल्या विद्यार्थ्यांना ग्रामीण संस्कृतीतीची ओळख व्हावी, तसेच ग्रामीण भागातील समस्यांची जाणीव व्हावी, राष्ट्राच्या विकासासाठी तरुणांचा सहभाग वाढविणे, पुस्तकी

ज्ञानाबरोबरच श्रमाची प्रतिष्ठा लक्षात यावी या उद्देशाने या कार्यक्रमाची स्थापना करण्यात आली. या कार्यालयातील समिती देखील अगदी महत्त्वाची भूमिका पार पडत असते.

या समितीचे कार्य खालील प्रमाणे आहेत.

१) गरज भासली तेव्हा बैठका घेऊन विद्यापीठांना मार्गदर्शन करणे.

२) विविध समस्या दूर करणे.

३) विद्यापीठ सल्लागार मंडळास मदत करणे.

### ३.४.३. राष्ट्रीय सेवा योजना राज्यपातळीवर

राष्ट्रीय सेवा योजना राज्यपातळीवरील सल्लागार समितीत संबंधित राज्याचे मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) हे समितीचे अध्यक्ष असतात. मा.राज्यमंत्री, (उच्च व तंत्र शिक्षण विभाग), मा. मुख्य सचिव, सर्व विद्यापीठाचे कुलगुरू, संचालक व्यवसाय शिक्षण, 2 स्तर व तंत्रशिक्षण, सचिव-उच्च, वैद्यकीय, तंत्रशिक्षण, जनसंपर्क, सहाय्यक ग्रामीण विकास, युवासेवा, पंचायत राज, कार्यक्रम सल्लागार, क्षेत्रीय कार्यालय, पुनर्वसन आयुक्त, प्रशिक्षण समन्वयक, प्रशिक्षण आणि संशोधन समन्वयक कार्यक्रम सल्लागार, राष्ट्रीय सेवा योजना युवा व खेळ मंत्रालय नवी दिल्ली, विद्यापीठाचे कार्यक्रम समन्वयक इ. या समितीचे सदस्य असतात. तर राज्य संपर्क अधिकारी हे सदस्य सचिव असतात.

या समितीत खालील निर्णय घेण्यात येतात.

१) विद्यापीठांच्या आर्थिक अंदाजपत्रकांना मान्यता देणे.

२) केंद्र सरकार व राज्यातील विद्यापीठे यांच्यातील दुवा म्हणून कार्य करणे.

३) राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित व विशेष शिबिराची अंतर्गत कार्यक्रमाची रूपरेषा तयार करणे.

४) विद्यापीठांना स्वयंसेवक संख्या वाटप करणे.

५) राष्ट्रीय सेवा योजना साहित्याची पूर्तता करणे.

६) राष्ट्रीय सेवा योजनेच्या निर्माण होणाऱ्या समस्यांच्या संदर्भात मार्गदर्शन करणे.

७) राष्ट्रीय सेवा योजनेच्या नाविन्यपूर्ण कार्यक्रमांचे नियोजन करणे.

### ३.४.४.राष्ट्रीय सेवा योजना विद्यापीठ पातळीवर

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यापीठीय सल्लागार समितीत संबंधित विद्यापीठाचे कुलगुरू असतात. मा. आयुक्त, प्रशासकीय विभाग किंवा त्यांचे प्रतिनिधी, कुलसचिव, सचिव/संचालक, उच्च शिक्षण, युवासेवा, सहाय्यक कार्यक्रम सल्लागार, प्रशिक्षण केंद्र समन्वयक, प्रशिक्षण आणि संशोधन केंद्र, तीन प्राध्यापक, चार प्राचार्य (संलग्नित महाविद्यालय) एक / दोन राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक प्रतिनिधी, एक / दोन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, पाच प्रतिनिधी शासकीय / अशासकीय संस्था, युवा सेवा / समाजकार्य / ग्रामीण विकास, वित्त व लेखा अधिकारी हे या समितीचे सदस्य तर राज्यसंपर्क अधिकारी व कार्यक्रम समन्वयक हे या समितीचे सदस्य सचिव असतात.

या समितीचे कार्य खालील प्रमाणे आहेत.

१) महाविद्यालयांना स्वयंसेवक संख्या वाटप करणे.

२) नवीन राष्ट्रीय सेवा योजना कक्षांना मान्यता देणे.

३) विविध कार्यक्रमाची आखणी करणे.

४) विद्यापीठांच्या इतर विभागांशी संयुक्तिक कार्यक्रम राबविणे.

५) नियमित व विशेष शिबिरांच्या कार्यक्रमाची रूपरेषा तयार करणे.

### ३.४.५.राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयीन पातळीवर

राष्ट्रीय सेवा योजनेच्या सल्लागार समितीचे अध्यक्ष संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य असतात. सामाजिक कार्याशी संबंधित दोन प्राध्यापक, एक प्राध्यापक विकास विभाग, एक प्रतिनिधी दत्तक गाव / वस्ती / कल्याणकारी संस्था, दोन राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, सामाजिक कार्यकर्ते हे या समितीचे सदस्य सचिव असतात.

या समितीचे कार्य खालील प्रमाणे आहेत.

१) वर्षभराच्या कार्यक्रमाचे नियोजन करणे.

२) स्वयंसेवक संख्याची नोंदणी करणे.

३) विद्यापीठाने सुचविलेल्या प्रमाणे कार्यक्रमांच्या अंमलबजावणीबाबत चर्चा करणे.

## ३.५ राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमातील विविध घटकाची नामावली व संकल्पना :

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी काही घटक महत्त्वाची कार्य करीत असतो. राष्ट्रीय सेवा योजनेची व्याप्ती खूप मोठी आहे, यात राष्ट्रीय पातळी पासून ते गाव पातळी पर्यंत विविध घटकाला आपापली कार्य अगदी व्यवस्थित रित्या पार पाडावी लागतात.

### १) रा.से.यो. स्वयंसेवक:

संबंधित महाविद्यालयात पदवीचे शिक्षण घेत असलेले विद्यार्थी स्वतःच्या इच्छेने राष्ट्रीय सेवा योजनेत प्रवेश घेत असतात. अशा विद्यार्थ्यांना रा.से.यो. स्वयंसेवक म्हणतात. असे विद्यार्थी रा.से.यो. च्या नियमित कार्यक्रमात व विशेष शिबिरात श्रमदान करत असतात. सामाजिक कार्यात स्वतःला वाहून घेतात. स्वयंसेवकाला राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून जीवन विषयक विविध पैलू अनुभवयास मिळतात. म्हणून स्वयंसेवक हा भविष्यात उत्तम नागरिक बनतो.

### २) रा.से.यो. युनीट:

संबंधित महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेत काम करणाऱ्या विद्यार्थ्यांचा समूह म्हणजेच रा.से.यो. युनीट होय. 'N.S.S. unit means the total strength of the N.S.S. volunteers at college level allotted and sanctioned by the Programme Coordinator in consultation with N.S.S. Regional Centre and State liaison officer, considering the demands of the college. The N.S.S. unit may have the strength from 50 volunteers up to 250 volunteers, depending on its size, initiative and social commitment.'[१०]

### ३) दत्तक गाव :

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागांनी गाव दत्तक घेणे म्हणजे त्या गावाच्या विकासाची जबाबदारी घेणे होय. 'युवकांनो खेड्याकडे चला' या उद्देशाने प्रत्येक महाविद्यालयाने एक गाव दत्तक घेऊन किमान ५ वर्ष त्या गावात कार्य करावे. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी अर्थात एकात्मिक विकासासाठी काम करणे गरजेचे आहे. प्रत्येक स्वयंसेवकाने आपल्या आवडीच्या कामाचा भाग निवडून शिबिरापूर्वी, शिबिरात व शिबिरानंतर गावात अथवा झोपडपट्टीत काम करावे.[११]

**४) समाज :**

राष्ट्रीय सेवा योजना व समाज याचा अतिशय सलोख्याचा संबंध आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचा महत्त्वाचा उद्देश म्हणजे समाज विकास होय. लोकांचा जनसमुदाय म्हणजेच समाज होय. समाज हा स्वयंसेवकासाठी विद्यापीठ असते. समाजाकडूनच स्वयंसेवकांना जीवन जगण्याच पायाभूत ज्ञान मिळत असते.

**५) रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी :**

कार्यक्रम अधिकारी हा संबंधित महाविद्यालयाचा कायम स्वरूपी प्राध्यापक असतो. प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असतात. कार्यक्रम अधिकारी हा नैतिक मूल्य जपणारा व आदर्श व्यक्ती असतो. याबरोबरच सामाजिक कार्याची आवड असणारा असतो. कार्यक्रम अधिकारी हा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असतो.

**६) जिल्हा समन्वयक :**

जिल्हा समन्वयक हा जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातील रा.से.यो. च्या कार्यक्रम अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवतो. विविध महाविद्यालयात चालविल्या जाणाऱ्या उपक्रमांना भेट देऊन नोंद घेत असतो.

**७) विद्यापीठ कार्यक्रम समन्वयक:**

विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागात विद्यापीठ कार्यक्रम समन्वयक म्हणून एकाची निवड केली जाते. विद्यापीठ समन्वयक हा त्याच विद्यापीठातील संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापक असतो. तो किमान तीन वर्ष रा.से.यो. चा कार्यक्रम अधिकारी काम केलेला असावा व Training and Orientation centre (TOC) अहमदनगर येथे प्रशिक्षण घेतलेला असावा लागतो. विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजने संदर्भात नियोजन करण्याचे महत्त्वाचे काम विद्यापीठ समन्वयक करत असतात. 'Programme coordinator is in charge officer appointed by the committee of the university to plan, execute and evaluate the N.S.S. activities in proper perspectives. The Programme coordinator has the responsibility to execute, all administrative and policy directions of the Government decisions of the State Advisory Committee and University Advisory Committee.'[१२]

८) **राज्य संपर्क अधिकारी :**

राज्य संपर्क अधिकारी हे महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या बैठीकीला हजार राहून मार्गदर्शन करतात. महाराष्ट्रातील अनेक विद्यापीठातील विकास विषयक घडामोडीचा आढावा घेत असतात. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांच नियोजन करत असतात. राज्य संपर्क अधिकाऱ्यांचे कार्यालय उच्च व तंत्रशिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, मंत्रालय, मुंबई येथे आहे.

९) **सहाय्यक कार्यक्रम सल्लागार :**

सहाय्यक कार्यक्रम सल्लागार यांचे कार्यालय राष्ट्रीय सेवा योजना, प्रादेशिक कार्यालय भारत सरकार, पुणे येथे आहे. सहाय्यक कार्यक्रम सल्लागार हे युवा कल्याण व खेळ मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पूर्ण वेळ अधिकारी असतात. राज्यातील राष्ट्रीय सेवा योजनेवर झालेल्या खर्चाचा आढावा घेतात. सहाय्यक कार्यक्रम सल्लागार हे राष्ट्रीय सेवा योजना प्रशिक्षण केंद्र व प्रशिक्षण व संशोधन केंद्राला भेटी देऊन कार्यक्रम अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करत असतात.

१०) **कार्यक्रम सल्लागार :**

कार्यक्रम सल्लागार हे राष्ट्रीय सेवा योजनेचे अतिशय महत्त्वाचे पद आहे. कार्यक्रम सल्लागार हे संपूर्ण देशातील रा.से.यो. प्रशिक्षण केंद्र व प्रशिक्षण व संशोधन केंद्राला वेळोवेळी भेट देऊन आढावा घेत असतात. 'Programme Adviser is a person appointed by the Ministry of Youth Affairs and Sports of the Central Government to supervise and monitor the activities of the N.S.S. in India. He advises the Department for the development of N.S.S. programme in all respects. He helps the Department to plan and implement the N.S.S. Programme.'[१३]

११) **रा.से.यो. प्रशिक्षण केंद्र :**

प्रत्येक राज्यात एक प्रशिक्षण केंद्र कार्यरत असते. महाविद्यालयातील एखाद्या प्राध्यापकाने राष्ट्रीय सेवा योजनेचा कार्यक्रम अधिकारी म्हणून जबाबदारी स्वीकारल्या नंतर रा.से.यो. चे प्रशिक्षण घ्यावे लागते. प्रशिक्षण वर्गात साधारण पणे रा.से.यो. चे कार्य, कार्यक्रमाचे नियोजन, अहवाल लेखन, खर्च व तपशील, व्यक्तिमत्त्व विकास, ग्रामीण विकास, आपत्ती व्यवस्थापन, जल संवर्धन इ. विषय हाताळले जातात.

**१२) रा.से.यो. प्रशिक्षण व संशोधन केंद्र :**

भारतात एकूण राष्ट्रीय सेवा योजना प्रशिक्षण व संशोधन केंद्र चार आहेत. राष्ट्रीय सेवा योजनेच्या नवीन उपक्रमावर संशोधन केले जाते. 'Training, Orientation and Research Centre means a place where Orientation, Refresher, Publication and Research are conducted with a view to develop right thinking and approach, leadership commitment and understanding of philosophy of National Service Scheme.'[१४]

**३.६ राष्ट्रीय सेवा योजनेची मुलतत्त्वे :**

सेवा व युवा हाच राष्ट्रीय सेवा योजनेचा केंद्र बिंदू आहे. राष्ट्रीय सेवा योजनेतून विधायक कार्य पार पाडले जाते. राष्ट्रीय सेवा योजनेतून भविष्याचे सुजाण नागरिक घडवले जातात. राष्ट्रीय सेवा योजना केवळ कार्यक्रम नाही तर सामाजिक संस्कार व विचार आहे म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेची मुलतत्त्वे पुढील प्रमाणे आहेत.

**१) सेवा :**

राष्ट्रीय सेवा योजने मार्फत जे उपक्रम राबविले जातात, त्याचा केंद्रबिंदू सेवा हाच आहे. समाज ज्या ज्या वेळी संकटात असतो, त्या त्या वेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी सेवा करण्यास तयार असतात. 'Service is the basic principle of human life. NSS develops emotions of "seva" among the youth studying in the college which is very important in the whole life of Human Beings.'[१५]

**२) एकता :**

देशाला मजबूत करणारा महत्त्वपूर्ण कणा म्हणजे एकता होय. परस्परांशी समानतेने वागणारी शिकवण केवळ राष्ट्रीय सेवा योजनेकडूनच मिळते. राष्ट्रीय सेवेत कार्य करताना युवक इतका एकरूप होतो की समाज माझ्र कुटुंब मानायला लागतो.

**३) सामाजिक बांधिलकी :**

सामाजिक बांधिलकी ची जाणीव करून देणारी महत्त्वपूर्ण कार्यशाळा म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना होय. राष्ट्रीय सेवा योजनेत काम करत असताना सामाजिक बांधिलकीची भावना युवकांमध्ये

आपोआपच वाढीस लागते. समाजावर आलेल्या कितीही मोठ्या संकटाला सडेतोड तोंड देण्याच धैर्य राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी करतात. याच महत्त्वाच कारण म्हणजे त्याच्या मध्ये असलेली सामाजिक बांधिलकी.

**४) त्याग :**

राष्ट्रीय सेवा योजनेची शिकवण इतकी महत्त्वाची असते की यामुळे समाजावर असलेल्या निष्ठेमुळे त्याग करत असतो. म्हणजेच आपल्या स्वतःच्या कितीही अडचणी असल्या तरी तो समाजासाठी त्याग करायला तयार होतो. ही उर्मी केवळ राष्ट्रीय सेवा योजना मुळेच मिळत असते.

**५) शिस्त :**

राष्ट्रीय सेवा योजना ही केवळ समाजासाठीच कार्य करणारी नसून. समाजासाठीच काहीतरी योगदान देताना आपोआपच राष्ट्रीय सेवा योजनेचे संस्कार युवकाच्या मनावर उमटत असतात. यातून युवकांमध्ये शिस्त निर्माण होते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिकवणी मुळेच युवक चांगल्या गोष्टीचा अनुकरण करतो व वाईट गोष्टी सोडून देतो.

**६) स्वावलंबन :**

राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये काम केलेला युवक हा स्वावलंबी होतो. राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी समाज सेवे बदल त्यांची असणारी तळमळ, समाजसेवेची निष्टा या गोष्टी विद्यार्थ्यांना स्वावलंबनाची शिकवण देत असतात.

## ३.७ राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टे

राष्ट्रीय सेवा योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे शिक्षक, स्वयंसेवक व समाज एकत्रित आणणे होय आणि हे घटक राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमाचे महत्त्वाचे आहे. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमात विविध अनुभवांवर आधारित उपक्रमांचा समावेश असतो. अशा उपक्रमामुळे स्वयंसेवकाला सेवा, सहभाग व परीपूर्ततेचा आंनद मिळू शकतो.[१६] विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजनेत कार्य करताना एकरूप होऊन कार्य करीत असतो. महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांना विद्यार्थ्यांना जे संस्कार होत असतात ते संस्कार युवकाला नवीन उर्जा देणारे असतात, यावेळेत मिळालेल्या संस्काराची अंमलबजावणी विद्यार्थी जीवनभर करीत असतो. विद्यार्थ्यामध्ये सामाजिक जाणीव व्हावी विद्यार्थ्यांचा रिकामा वेळ समाजसेवेसाठी खर्च व्हावा हा राष्ट्रीय सेवा योजनेचा महत्त्वाचा उद्देश आहे. आपल्या हितापेक्षा दुसऱ्याच्या हिताचा विचार करतो ही वृत्ती राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून निर्माण होते. समाज सेवेतून शिक्षण आणि शिक्षणातून आत्मविकास व आत्मविकासातून राष्ट्राचा विकास असा राष्ट्रीय सेवा योजनेचा प्रवाह आहे. राष्ट्रीय सेवा योजने मुळे समाजाची घडी बदलण्याचे कार्य केले जाते. याबरोबरच ग्रामीण भागातील लोकांसमोराचे अज्ञानाचे धुके हटवून नव्या ज्ञानाचा प्रकाश देण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजने मुळेच होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून व्यासपीठ मिळते. ग्रामीण समाजाला नवसंजीवनी मिळवून देण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजने मुळेच मिळते. ग्रामीण समाजाला त्यांच्या हक्क व कर्तव्याची जाणीव करून देऊन त्यांना जागृत करण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक करतात. याबरोबरच एकमेकांबद्दल सहकार्याची भावना, साह्यचर्याची भावना, आत्मविश्वास, आत्मनिर्भरता, स्वावलंबन अशा अनेक सद्गुणाची शिकवण ही राष्ट्रीय सेवा योजनेमुळेच मिळत असते. या योजनेच्या माध्यमातून केवळ भौतिक विकासच केला जात नाही तर आत्मिक विकास ही केला जातो. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून नेतृत्व विकास ही साधला जात असतो.

राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

१) राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी समाजामध्ये कार्य करीत असताना त्यांना समाजामध्ये असणाऱ्या सामाजिक समस्यांची जाणीव होते याबरोबरच विद्यार्थी समस्यांचा अभ्यास करून ती समस्या सोडवतात.

२) ज्या समाजात आपण राहतो त्याविषयी आपुलकी, बंधुभाव निर्माण करणे.

३) समाजात लोकसहभाग व सामुदायिक जबाबदारीची जाणीव निर्माण करून देणे.

४) स्वत:मध्ये आवश्यक ते चांगले बदल घडून आणणे.

५) विद्यार्थ्यामध्ये राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक जाणीव वाढविणे.

६) ग्रामीण भागातील युवकांमध्ये नेतृत्व गुण निर्माण करणे.

७) ग्रामीण भागात जाऊन श्रमदान, प्रबोधन करून ग्रामीण विकास करणे.

८) समाज व राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने प्रयत्न करणे.

९) ग्रामीण भागातील आरोग्य बाबत काळजी घेणे.

या सर्व उद्दिष्टाची पूर्तता करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे युवक तळमळीने सेवा करतात. राष्ट्रीय सेवा योजनेत विद्यार्थी प्रवेश घेतल्या नंतर त्या विद्यार्थ्यांच्या वर्तनात निश्चित बदल होते. राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी आपल्यातील वाईट सवयी काढून टाकतो व समाजाला उपदेश करतो.

## संदर्भ ग्रंथ सूची :


१) चाकने, संजय व पाब्रेकर, प्रमोद (२०१०): *राष्ट्रीय सेवा योजना संकल्पना,* डायमंड पब्लिकेशन्स, पुणे पृ.क्र.११

२) *National Service Scheme* (Manul) Government of India Ministry of Human Resource Development Department of Youth Affairs and Sports (1997) Page no. ७

३) भागवत, देविदास, *राष्ट्रीय सेवा योजना आणि युवक,* पवार, दत्तात्र्य (संपा.) *राष्ट्रीय सेवा योजना* श्रमतीर्थ द्विवार्षिकांक, (१९९९-२००१), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड पृ.क्र.२००

४) कुलकर्णी, विजय, *ओळख बिनभिंतीच्या महाविद्यालयाची,* अंबेकर, बाळासाहेब (संपा.) *राष्ट्रीय सेवा योजना,* श्रमतीर्थ द्विवार्षिकांक, (१९९९-२००१), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड पृ.क्र.३०

५) कित्ता पृ.क्र.३१

६) कित्ता पृ.क्र.३१

७) उपरोक्त, *National Service Scheme* (Manul) पृ.क्र.७

८) अंबेकर, बाळासाहेब (संपा.) *राष्ट्रीय सेवा योजना,* श्रमतीर्थ द्विवार्षिकांक, (२००१-२००३), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड पृ.क्र.१

९) उपरोक्त, चाकने, संजय व पाब्रेकर, प्रमोद *राष्ट्रीय सेवा योजना संकल्पना,* पृ.क्र.१५

१०) Ghorpade, Nitin (2008): *Administration and Management of National Service Scheme,* Prafulata Publication, pune. page no.31

११) उपरोक्त, चाकने, संजय व पाब्रेकर, प्रमोद *राष्ट्रीय सेवा योजना संकल्पना,* पृ.क्र.१९

१२) उपरोक्त, Ghorpade, Nitin, *Administration and Management of National Service Scheme,* पृ.क्र.३०

१३) कित्ता पृ.क्र.३१

१४) कित्ता पृ.क्र.३२-३३

१५) कित्ता पृ.क्र.३५

१६) उपरोक्त, चाकने, संजय व पाब्रेकर, प्रमोद *राष्ट्रीय सेवा योजना संकल्पना,* पृ.क्र.१८